"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL : nkgsbs@gmail.com**

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। सज्जनं अविरत वन्दे ।।

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५

| | | |
|---|---|---|
| क्रमांक १ | वर्ष : ३९ | एप्रिल-जून २०१७ |

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## ।। पुण्यस्मरण ।।



**श्रीमती कमल सदानंद वागळे**

**देवाज्ञा : १० जून २०१६**

**वाटलं नव्हतं कोणाला असं अघटित घडून येईल,**
**चालता चालता तुला देव असा दूर नेईल,**
**माणूसकी, स्नेह, माया, ममतेची ज्या ज्यावेळी चर्चा होईल,**
**त्या त्यावेळी सर्वात पहिली तुझी आठवण येईल .......**

**वागळे परिवार ठाणे (प)**

ॐ

## SAI LUNCH HOME AND CAFÉ,KARWAR

## कारवारकर खवय्यांना खुशखबर

आपल्या ज्ञातिबांधवांचे आतां काळी ते गंगावळीच्या परिसरांतून मुंबई ते अमेरिकापर्यंत जवळजवळ संपूर्ण स्थलांतर झाले आहे. पण ते माजाळी ते होन्नेकेरी पर्यंतच्या आपल्या मूळ गांवाला वा तिकडच्या माशांच्या विविध प्रकारांना विसरले नाहीत. कुठलेही दोन कारवारकर अंधेरी किंवा सिटी लाईटच्या फिश मार्केटमध्ये भेटले तर त्यांचा एकमेकांना पहिला प्रश्न असतो, 'आज किते मेळ्ळे.' ते गोव्याला गेले तर एक वेळ मंगेशीची सोमवारची पालखी चुकवतील पण कारवारला गेल्यावेळी रविवारचा 'साते बाजार' चुकवणार नाहीत. ही मंडळी जेव्हां कारवारला जातात तेव्हां 'भूस' कुठे मारायचा असा प्रश्न पडतो. आता ही समस्या दूर झाली आहे. तेथे मेन रोडवर बोरकरांच्या हॉटेल साई इंटरनॅशनलच्या लगत 'मांगिरीश प्लाझा' येथे जिभेचे चोचले पुरविणारे अस्सल कारवारी पध्दतीचे खाद्यपदार्थ मिळण्याची सोय झाली आहे.

तेव्हा कारवारला गेल्यावेळी किस्मूर, धबधबे, धोडक, घालणीची भाजी, तिसरेमासाचे वडे यावर ताव मारण्यासाठी भेट द्या.

**मांगिरीश प्लाझा, हॉटेल साई इंटरनॅशनलजवळ, मेन रोड**

# संपादकीय

## मृदुला भांडारकर हिची सत्तरी

आपला संघ व एज्युकेशन सोसायटी या उभय संस्था व त्यांचे व्यवस्थापन सांभाळणारी मृदुला भांडारकर यांचे एक समीकरणच झाले आहे. गेली २५ हून अधिक वर्षे काम केल्यामुळे तिचा ज्ञातीतील असंख्य बंधुभगिनींशी जिव्हाळयाचे नाते निर्माण झाले आहे. अशा या लोकप्रिय मृदुलाला १२ मार्च २०१७ रोजी ७० वर्षे पूर्ण झाली. त्यासाठी तिला खास शुभेच्छा.

कुठल्याही संस्थेचे व्यवहार चोखपणे चालवायचे असतील तर कार्यक्षम विश्वस्तांशिवाय कार्यालयात रोजचा कारभार व्यवस्थित सांभाळणाऱ्या व्यक्तीचीही गरज असते. सुदैवाने उभय संस्थांना मृदुलाच्या रूपाने अशी तन मन धन झोकून काम करणारी व्यक्ती मिळली आहे. कुठलाही पूर्वीचा अनुभव नसताना मोठया परिश्रमाने सर्व पध्दती आत्मसात करुन ती उभय संस्थांचा वाढता डोलारा सांभाळत आहे. काही महिन्यापूर्वी तिला चिकनगुनिया या रोगाची लागण झाली होती पण डॉक्टरी सल्ल्यानुसार विश्रांतीची नितांत गरज असूनसुध्दा थोडेसे बरे वाटल्यावर ती कार्यालयात हजर. एवढी तिची कामावर निष्ठा.

पतीनिधनानंतर १९९० पासून तिने कामाला सुरुवात केली. तेव्हांपासून गेली २७ वर्षे उभय संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा, कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धा, ज्ञातीचे वार्षिक स्नेहसंमेलन यांत तिने एकाही वर्षाचा खंड पडू न देता सर्व कार्यक्रम निर्विघ्नपणे पाडण्यासाठी ती जीवापाड मेहनत घेत असते. प्रत्येकवेळी सर्वप्रथम हजर राहून पूर्वतयारी करण्यापासून कार्यक्रम संपन्न झाल्यावर सगळा पसारा आवरण्यासाठी शेवटपर्यंत उपस्थित राहणारी एकमेव व्यक्ती म्हणजे मृदुला. त्या संबंधात मागे तिच्या संबंधी लिहिलेला एक परिच्छेद उद्धत करण्यासारखा आहे. पु. लं. च्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकात 'नारायण' या नांवाचे एक व्यक्तीचित्र आहे. मृदुलाची नारायण यांच्याशी तुलना करता येईल. विवाहाच्या मंडपरूपी रणागणांत नारायण चोहोकडून होणाऱ्या शत्रूंचा वार झेलणाऱ्या रणमर्दाच्या थाटांत आज्ञा, हुकूम बेफिकीरपणे झेलीत असतो. मृदुला सुध्दा प्रत्येक कार्यक्रमाच्या अंतर्गत टोमणे, उपमर्द, आज्ञा, विनंती, कौतुक हसतमुखाने झेलीत असते.

गरीबांविषयी तिला विशेष कणव. 'रुद्र: बुभुक्षित रूपेण अवतिष्टते' या उक्तीनुसार प्रत्येक गरजू व्यक्ती खरी शंकरच असते व ती व्यक्ती आपली परीक्षाच घेत असते या श्रध्देने ती त्याला सन्मानाने वागविते. अनेक प्रसंगी ती पदरमोडसुध्दा करते.

२०१५ साली तिच्या अखंडित सेवेच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या प्रसंगी ज्ञातीच्या वार्षिक स्नेह संमेलनात तिचे जाहीर कौतुक करण्यात आले. तिच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त संघाच्या कार्यकारिणीच्या सभेतही केक कापून तिला शुभेच्छा देण्यात आल्या.

**जीवेत् शरद : शतम्**

१.४.२०१७

द.ना.नाडकर्णी

# एज्युकेशन सोसायटी - शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

एज्युकेशन सोसायटीतर्फे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. लाभार्थींनी अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख पुढीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी | ३० जून २०१७ |
| महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी | ३० जून २०१७ |

(मेडिकल व इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर अर्ज पाठवले तरी चालतील) याशिवाय खाली नमूद केलेल्या अभ्यासासाठीही शिष्यवृत्ती देण्यात येतात. संबंधित पालकांनी व गरजू विद्यार्थ्यांनी याची कृपया नोंद घ्यावी व त्याचा पूर्ण लाभ घ्यावा. ही विनंती.

**विषय :**

- संगीत, नाटक, नृत्य
- व्यायाम, क्रीडा, गिर्यारोहण
- राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा( सी.ए.कॉस्टिंग, एन्.डी.ए. सिव्हील सर्व्हिसिस इ)
- संगणकावर आधारित प्रशिक्षण
- वैदिक अभ्यासक्रम, गीताभ्यास
- जर्मन, फ्रेंच इत्यादी परकीय भाषा
- शैक्षणिक सहल

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग किंवा कोचिंग क्लासेस यासाठी लागणारा खर्च संस्थेच्या उत्पन्नानुसार देण्यात येईल व तो कार्यकारिणीच्या विचाराधीन असेल.

**कर्जाऊ शिष्यवृत्त्या :** उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्त्या देण्यात येतात.
भारतातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (प्रतिवर्षी १,००,०००)
परदेशातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (एक रकमी)

**गृहिणींसाठी** : गृहिणींसाठी कुठल्याही व्यावसायिक किंवा संगणक शिक्षणासाठी अर्ज करुन शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
शैक्षणिक पात्रता : बारावी

विशेष माहितीसाठी कार्यालयात येऊन चौकशी अथवा २३८७७३०१ वर कार्यालयीन वेळांत संपर्क साधावा.

# प्रकाशझोत

## संघ कार्यकारिणीतर्फे मुखपत्रिकेचे लोकप्रिय संपादक श्री. द. ना. नाडकर्णी यांचा ८० व्या वाढदिवसानिमित्त सत्कार

कारवारकरांचे लाडके व्यक्तिमत्त्व श्री. दत्तात्रय नाडकर्णी (डी.एन) यांना ७ जानेवारी रोजी ८० वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त १३ जानेवारी रोजी भरलेल्या संघाच्या कार्यकारिणीच्या सभेत त्यांचा कौटूंबिक पध्दतीने सत्कार करण्यात आला.

सुरवातीला संघाचे अध्यक्ष श्री. मारुती दळवी यांनी त्यांच्या कार्याची महती व स्वरूप समजावून सांगितले. हसरा चेहरा, कामात नीटनेटकेपणा व कामाचे योग्य नियोजन ही डी. एनची खासियत.

सातत्याने ४० वर्षे मुखपत्रिकेचे त्यांनी संपादकत्व व संघाची कामे सांभाळली, सर्व ज्ञाति बांधवांचे पत्ते वेळोवेळी अद्ययावत करणे (त्यासाठी अगणित फोन) यासारखे जिकीरीचे काम, संघाची घटना दुरुस्ती लिहिण्याचे काम, मुखपत्रिकेत प्रकाशझोत सारखी सदरे सुरु करणे, त्याचप्रमाणे ज्ञातीतील लोकांकडून लेख लिहून घेऊन त्यांना लिखाणास उद्युक्त करणे, ठाणे मंचाचे संघात विलीनीकरण करण्याच्या कामात मदत करणे ही कार्ये तर झालीच. मुख्य म्हणजे देणगीदारांची थोडक्यात माहिती देणे जेणेकरुन देणग्यांमध्ये त्यानुसार वाढ होणे, इत्यादी लिखाण हे फक्त डी. एन. आणि डी. एनच करु जाणे. डी. एन. म्हणजे ज्ञातीतील चालता बोलता इतिहासच होय, ते ज्ञातीतील सर्वच जणांना ओळखतात ते ही पिढयान्‌पिढयांची ओळख. त्या माहितीचा उपयोग त्यांनी अनेक कुटुंबीयांचे वंशवृक्ष बनविण्यांत केला. आतापर्यंत त्यांनी चाळीसहून अधिक वंशवृक्ष बनविले आहेत. एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी यानीही त्यांच्या कार्याचे कौतूक केले. व्यवसायाने डी. एन. इंजिनियर. त्यात त्यांची पुण्याला बदली झाल्यावेळी दर तीन महिन्यांनी मुंबईस येऊन ते मुखपत्रिकेचे काम करीत त्यात कधीच खंड पडू दिला नाही. अशी चार वर्षे.

श्री. प्रदीप देसाई, कार्यकारिणीचे एक सदस्य, व त्यांच्यात कंपनीत काम करणारे, त्यानीही त्यांच्या इंजिनियरिंगच्या कामातील कौशल्य वाखाणले. याच सभेमध्ये आपल्या बँकेचे चेअरमन श्री. किशोर कुलकर्णी व कार्यकारी संचालक श्री. चिंतामणी नाडकर्णी यांची विशेष उपस्थिती होती. सोसायटीच्या कार्यकारिणी तर्फे उपाध्यक्ष डॉ. विवेक कुलकर्णी हेही हजर होते.

सर्वांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा व चांगले आयुष्यारोग्य लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना केली.

पुष्पगुच्छ व अल्पोपाहार देऊन या छोटेखानी हृद्य समारंभाची सांगता झाली.

**मृदुला भांडारकर, गिरगांव**

## 'शब्द द बुक गॅलरी' तर्फे कादंबरीकार वसंत फेणे यांना पुरस्कार

बोरीवली येथील 'शब्द द बुक गॅलरी' या संस्थेतर्फे प्रतिवर्षी साहित्यांतील विविध क्षेत्रांतील चाकोरीबाहेरील कौशल्यपूर्ण लेखनासाठी शब्द पुरस्कार देण्यांत येतात. सर्वसामान्य माणसांचे अनुभवविश्व उत्कृष्टपणे रेखाटणारे कथा व कादंबरीकार श्री. वसंत नरहर फेणे यांना यंदाचा भाऊ पाध्ये साहित्य गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण समारंभ एप्रिलमध्ये संपन्न होणार आहे.

प्रख्यात साहित्यिक जयवंत दळवी यांचे लेखन नाटक, कादंबरी व विनोद या तीन क्षेत्रांत विशेष उल्लेखनीय होते त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ या तीन क्षेत्रातील उत्तम साहित्यकृतीला मॅजेस्टीक प्रकाशनातर्फे प्रतिवर्षी आलटून पालटून जयवंत दळवी पुरस्कार देण्यात येतो. २००५ साली कादंबरी या प्रकाराअंतर्गत हा पुरस्कार श्री. फेणे यांना त्यांच्या 'विश्वंभरे बोलविले' या कादंबरीसाठी देण्यांत आला होता.

## सौ. विजया वाघ लिखीत 'कारवारी मेजवानी' या पुस्तिकेचे प्रकाशन

आपल्या ज्ञातीतील सर्वांना कारवारी पदार्थ प्रिय आहेत. पण हल्लीच्या धकाधकीच्या जीवनांत तरुण मुलींना स्वयंपाक करण्यास वेळ नसतो. पूर्वीसारखी एकत्र कुटुंबेही राहिली नाहीत. आजी-सासूंकडून स्वयंपाक शिकणेही शक्य होत नाही. आपल्या ज्ञातीतील तरुण पिढीला रुचकर जेवण सुलभ व्हावे म्हणून सौ. विजया मंगेश (सुनील) वाघ यांनी अलीकडेच 'कारवारी मेजवानी' ही पुस्तिका लिहिली आहे. कारवारी भाज्या, कारवारी आमटया, भरीत व कोथिंबिरी, गोड पदार्थ, मांसाहारी पदार्थ, नाश्त्याचे पदार्थ, दिवाळीचा फराळ या सात सदरांखालील विविध पदार्थांच्या रेसीपीज सोप्या भाषेत विशद केल्या आहेत. संबंधीतांना त्याला उपयोग होईल ही आशा.

(उपलब्ध : विजया वाघ : ९८२१७३२९१६, मूल्य रु. १००)

## डॉ. महेश नारायण संझगिरी ह्यांचा पक्षी पर्यटनविषयक प्रबंध आंतरराष्ट्रीय संमेलनामध्ये सादर

पारले येथील श्री. नारायण शिवराम संझगिरी मूळ गांव गांवगेरी, माजाळी ह्यांचे सुपुत्र डॉ. महेश नारायण संझगिरी पक्षीसंशोधन विषयक Research Paper - "UNIQUE NEW CONCEPT IN BIRD TOURISM" आंतरराष्ट्रीय पक्षीविषयक संमेलनामध्ये (The International Conference on Birds, Biodiversity and Tourism 2016) सादर केला.

संपूर्ण जगातून निवडल्या गेलेल्या विविध देशातील Research Paper मध्ये त्यांचा एकमेव Research Paper Bird Tourium  म्हणजे पक्षी पर्यटनविषयक होता. त्यामध्ये डॉ.

संझगिरी ह्यांनी पक्षी पर्यटनविषयक नवीन गणिती सूत्र (Mathematical formula) सादर केले की जे Dr. Mahesh Sanzgiri's Mathematical Formula for Bird Tourism म्हणून स्वीकारले गेले. ज्याचा उपयोग पक्षी पर्यटनविषयक शिक्षणासाठी केला जाईल. हे संमेलन कोलंबो, श्रीलंका येथे सोमवार, दिनांक १४ नोव्हेंबर २०१६ ह्या दिवशी झाले.

**बिल क्लिन्टन यांच्या 'क्लिन्टन ग्लोबल इनीशिएटीव्ह' तर्फे आयोजित हल्ट पारितोषिक स्पर्धेसाठी भारतातर्फे संचित तेलंग याची निवड**

अमेरिकेतील हल्ट पारितोषिक स्पर्धा. ही जागतिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी सामाजिक क्षेत्रासंबंधीची सर्वात मोठी स्पर्धा ही स्पर्धा अमेरिकेचे माजी अध्यक्ष बिल क्लिन्टन यांच्या क्लिन्टन ग्लोबल इनीशिएटीव्ह या सामाजिक संस्थेतर्फे व हल्ट इंटरनॅशनल बिझीनेस स्कूलतर्फे भरविण्यात येते. ही स्पर्धा विद्यार्थ्यांमधील सामाजिक योगदानाबद्दल कार्यतत्पर असणाऱ्या क्षेत्रासंबंधी असते. यंदाचा विषय आहे जगभरांत विखुरलेल्या लाखो निर्वासितांच्या समस्येसंबंधी आहे. १५० राष्ट्रामधून हजारो विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. अंतिम स्पर्धेसाठी मोजक्याच स्पर्धकांची निवड करण्यांत आली आहे. भारतात चाचणी स्पर्धा नवी दिल्ली येथे जानेवारी महिन्यांत भरली होती. त्यांत सुमारे ५५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यांत दहाजणांची जागतिक स्तरावरील स्पर्धेत भाग घेण्यासाठी निवड करण्यांत आली आहे. त्यांत संचित तेलंगचा समावेश आहे. त्यासंबंधीच्या प्रशस्ती पत्रकावर बिल क्लिन्टनची स्वाक्षरी आहे.

अंतिम स्पर्धा बोस्टन, सान फ्रान्सिस्को, लंडन, दुबई व शांघाय येथे होणार आहे. संचित त्यासाठी शांघाय येथे रवाना झाला आहे.

संचित हा दादर येथील नितीन नागेश तेलंग यांचा पुत्र आहे. तो डेन्टल सर्जनची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. तो प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या XLRI जमशेदपूर येथे एम्. बी.ए चा विद्यार्थी आहे. छापता छापता : लंडन येथे अंतिम फेरीसाठी सचिनची निवड झाली आहे.

**सलील नाडकर्णी यांना कराटे पध्दतीत आठवा ब्लॅकबेल्ट प्रदान - भारतात पहिले**

पुणे येथील सलील श्रीपाद नाडकर्णी यांना अमेरिकेतील फ्लॉरिडा स्थित डॉ. मिलेज मर्फी (९ वा दान ब्लॅंकबेल्ट) यांचेकडून इशिनरियू कराटे पध्दतीतील आठवा (८वा) दान ब्लॅकबेल्ट प्रदान करण्यात आला.

श्री. सलील नाडकर्णी हे १९९० पासून कराटे प्रशिक्षण वर्ग चालवितात. त्यांनी सन १९९६ व २००३ मध्ये अमेरिकेत व सन २०००, २००५, २००७ मध्ये ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या जागतिक कराटे स्पर्धेत एकूण ८ प्रथम क्रमांकाचे चषक पटकाविले आहेत.

त्यांनी Prison Police, Pune, Railway Police Pune व कारवार येथील

पोलिसांना Unarmed Advanced Combative Techniques चे प्रशिक्षण दिले आहे.

जुलै २०१६ रोजी, सलील नाडकर्णी ह्यांची 'Sensei of Sensei' (गुरुंचे गुरु) हया गौरवासाठी टेनेसी, अमेरिका येथील 'इशिनरियू हॉल ऑफ फेम' ह्या संस्थेने निवड केली.

८ वा दान ब्लॅक बेल्ट ही इशिनरियू कराटे पध्दतीतील श्रेणी अधिकृतरित्या मिळविणारे ते पहिले भारतीय कराटेपटू होत.

अधिक माहितीसाठी सलील नाडकर्णी ह्यांच्या www.ikkai.org ह्या संकेतस्थळास भेट द्यावी. किंवा भ्रमणध्वनी ९१-९८२२५९७७७६ वर संपर्क साधावा.

## सांगली येथील श्वेता नाडकर्णी भारती विद्यापीठाच्या अंतिम एम्.बी.बी.एस्. परीक्षेत गुणवत्ता यादीत तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण

गेल्या पिढींतील सर्वांच्या परिचयातले सदाशिवगड येथील कै. गणपत पांडुरंग नाडकर्णी ऊर्फ गणपत मास्तर यांचा नातू शिवानंद महारुद्र नाडकर्णी यांचे वास्तव्य सांगली येथे आहे. त्याची कन्या कु. श्वेता ही अलीकडेच भारती विद्यापीठ या स्वायत्त विद्यापीठांतूप एम्.बी.बी.एस् च्या तिसऱ्या व अंतिम परीक्षेत गुणवत्ता यादीतून तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. दुसऱ्या परीक्षेतही तिला तिसरा क्रमांक मिळाला होता. व पॅथॉलॉजी व मायक्रोबायोलॉजी या विषयात तिला डिस्टींक्शन मिळाले होते. तिला नेत्ररोगतज्ज्ञ व्हायचे आहे. त्यासाठी पदव्यूत्तर प्रवेशासाठी ती NEET चा अभ्यास करीत आहे.

## महाबळेश्वर सैल 'सरस्वती सन्मान' पुरस्कार मिळविणारे पहिले कोंकणी साहित्यीक

मूळ माजाळी गांवचे ज्येष्ठ साहित्यीक महाबळेश्वर सैल यांच्या 'हावठण' या कोंकणी कादंबरीसाठी यंदाचा मानाचा असा 'सरस्वती सन्मान' पुरस्कार देण्यांत आला आहे. भारतीय भाषेंतून साहित्य निर्मिती करणाऱ्या लेखकास प्रतिवर्षी राष्ट्रीय पातळीवरील हा सन्मान के. के. बिर्ला फाऊंडेशनमार्फत देण्यांत येतो. १५ लाख रुपये, प्रशस्तीपत्रक व स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप असते. त्यासाठी लेखकाच्या दहा वर्षाच्या कारकीर्दीचा लेखाजोगा घेतला जातो. 'हावठण' ही कादंबरी २००९ साली प्रकाशित झाली होती. आधुनिकतेच्या रेटयाखाली गोव्यांतील कुंभार समाजाच्या जगण्याला कसे तडे जात आहेत याचे चित्रण या कादंबरीत आहे. कोंकणी साहित्यिकाला मिळालेला हा पहिलाच पुरस्कार होय. कोंकणीत सात कादंबऱ्या, मराठीत चार नाटके व एक कादंबरी याशिवाय अनेक लघुकथा असे त्यांचे साहित्यीक योगदान आहे.

# शाल्मली झणकर हिच्या कथ्थक नृत्यशैलीची सेवा श्री शान्तादुर्गेच्या चरणी !

कला ही 'स्वान्त:सुखाय' तर असतेच. पण रसिकांच्या उपस्थितीत ती सादर करण्यासाठी प्रत्येक कलाकाराला धन्यता वाटते. तसेच, कला कोणतीही असो, तिचा अविष्कार ईश्वराच्या मूर्तीसमोर करता आला तर त्याला स्वर्ग हाती आल्याचाच अननुभूत आनंद मिळाल्यावाचून रहात नाही !

आनंदाचे असेच अमूल्य क्षण जिच्या भाग्यात आले, ती कलावती म्हणजे 'शाल्मली झणकर'.

आपल्या मुखपत्रिकेच्या एक ज्येष्ठ स्तंभलेखिका 'श्रीमती शान्ता झणकर' यांची ही नात, आणि डॉ. श्री. राजीव व डॉ. सौ. माधवी झणकर यांची सुकन्या. अगदी लहानपणापासूनच नृत्य करण्याची शाल्मलीला आवड. जणू नृत्यकला ही तिला लाभलेली अंगभूत देणगीच !

वयाच्या सहाव्या वर्षापासून आज पंधरा वर्षे ती नृत्याची आराधना करीत आहे. गुरुश्री 'कै. आशा जोगळेकर' यांच्या शिष्या श्रीमती 'मनीषा जीत' या सुप्रसिध्द नृत्यगुरूंकडे कथ्थक नृत्याचे धडे गिरवीत असताना हिऱ्याला पैलू पडावे, तशी तिची नृत्यकलाही अधिकाधिक पैलूदार होत गेली ! अधिकाधिक बहरत गेली !

आणि वयाच्या सातव्या वर्षापासून अनेक स्पर्धांमध्ये मिळालेल्या सुमारे 'पंचवीस पारितोषिकांची' ती मानकरी होऊ शकली.

प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'पं. पलुसकर ट्रॉफी, स्वरसाधना ट्रॉफी', यांसह 'इस्कॉन मंदिराच्या बालोत्सव स्पर्धेतील तीन प्रथम पारितोषिकं तिने पटकावली. भारत सरकारच्या 'बालश्री' या पुरस्कार स्पर्धेत जिल्हा, राज्य व विभाग (झोनल) पातळीवर विजेती ठरुन राष्ट्रीय कॅम्पमध्ये सहभाग घेण्यासाठी ती पात्र ठरली. भारत सरकारतर्फे 'सेंटर फॉर कल्चरल् रिसोर्सेस् अॅन्ड ट्रेनिंग' कडून शाल्मलीला शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. तिच्या नृत्यकलेतील प्रावीण्याला दाद देत 'नालंदा' विद्यापीठाकडून 'कोविद' ही पदवी, तर 'अखिल भारतीय गांधर्व' विद्यापीठातर्फे 'कथ्थक विशारद' ही उपाधी तिला बहाल करण्यात आली.

इ.स. २०१५ साली उत्तुंग परिवारांने जाहीर केलेला 'उत्तुंग कलानैपुण्य पुरस्कार' ही शाल्मलीने हस्तगत केला !

'मुगले आझम' या चित्रपटावरील संगीतिका 'एन्.सी.पी.ए.' च्या विद्यमाने सध्या सादर होत आहे. 'कथ्थक नृत्यांगना' म्हणून तिच्यातील शाल्मलीचा सहभाग खरोखर वाखाणण्यासारखा आहे !

अशा या गुणवती नृत्यांगनेच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा खोवला गेला !

कवळे येथील श्रीशान्तादुर्गा हे 'झणकर (रेगे)' घराण्याचं कुलदैवत. माघ महिन्यातील वसंत पंचमीच्या निमित्ताने होणाऱ्या सोहळ्याच्या प्रसंगी नृत्य सादर करण्याची संधी शाल्मलीला मिळाली. विशेष कौतुकाची गोष्ट अशी, की मंदिराबाहेरील मंचावर नृत्य करण्याऐवजी देवीच्या मंदिरात तिच्या मूर्तीसमोरच आपली कला सादर करुन नृत्यरूपानेच तिची पूजा बांधावी, ही तिची इच्छा होती. आणि मंदिराच्या कार्यवाहांनी अनुमती दिल्यामुळे या इच्छेला मूर्त रूप मिळालं!

दिनांक ३० जानेवारी २०१७ रोजी शाल्मलीने 'सरस्वती वंदना, अर्धनारीश्वरस्तुती' वगैरेंवर आधारित अनुपम अशा नृत्याविष्काराचा नैवेद्यच जणू श्रीशांतादुर्गेच्या चरणकमलांपाशी अर्पित केला. अर्थात्, तो ग्रहण करुन देवीने तिला स्वकृपेचं अन् सर्वांगीण यशाचं वरदान नक्कीच दिलं असणार!


जमलेल्या प्रेक्षक-भक्तांपैकी बऱ्याचजणांनी आपल्यातर्फे बक्षीसे देत तिच्या कौशल्याची जणू काही पावतीच दिली!

मिळालेल्या संधीचं सोनं करुन शाल्मलीने एका अनोख्या, स्वर्गीय आनंदाचा अनुभव घेतला आहे, असं म्हणावयास हरकत नाही.

"शाल्मली, सर्वदा विजयिनी भव."
तव यशो भातु शरच्चन्द्रमरीचिवत्!!


**सौ. नीलिमा शशिकान्त नाडकर्णी, माहीम**
(२४३०९५४४)


MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD
402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




Can we help you to achieve your goal???
& your goal is.....

Let's reach nearer
To your highest GOAL!!!
Step by step....




A little every month grows to something significant over time!!!
Invest Rs. 1000/- Per month & get...

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




Indian Equity market has given avage 16% return s in last 32 year s...

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

# ठाणे मंचाची सहल 'मॉस रिसोर्ट'

जानेवारी महिना आला की ठाणे मंचाची सहल व मकर संक्रान्तीचा सस्नेह मेळावा हे समीकरण झाले आहे. ह्यावर्षी जानेवारीच्या ८ तारखेला वसईजवळ 'मॉस रिसॉट' हे सहलीचे ठिकाण असल्यामुळे माहीम, जोगेश्वरी, मुलुंड व ठाणे येथून तीन बस सकाळी ७.३० वाजता सुटल्या. वाटेत बाहेरच्या थंड गारव्यात सर्वांनी चहा बिस्कीटाचा आस्वाद घेतल्यामुळे अंताक्षरी खेळण्यात खूपच मजा आली. त्यामुळे रिसोर्टला कधी पोहोचलो हे कळलेच नाही. ९.३० वाजेपर्यंत सर्व बस रिर्सार्टला पोचल्या. एकमेकांचे परिचयाचे चेहरे दिसल्याने सकाळच्या भरगच्च नाष्ट्याबरोबर गप्पा गोष्टींना ऊत आला होता.

सर्व उपस्थितांना एकत्र बसवून सुरेश पालेकर यांनी ठाणे मंचाचे कमिटी मेंबर किरण दिवेकर, दुर्गादास रेगे, व चित्रा कामत यांची ओळख करुन दिली तसेच ठाणे मंचाच्या वधूवरांचे काम पाहाणाऱ्या जोगेश्वरीच्या अनुजा नाडकर्णी यांचाही परिचय करुन देण्यात आला. त्यानंतर वज्रेश्वरी पाहाण्यासाठी एक बस सोडली गेली. पण तिथे भाविकांची खूपच गर्दी होती. त्यामुळे बाहेरुनच दर्शन घेऊन येताना वसई गावांतील ताज्या हिरव्यागार भाज्या व बोरे घेऊन काहीनी त्यावरच समाधान मानले.

रिसोर्टला परत आल्यावर प्रकाश वाघ यांनी कांही विनोदी किस्से सांगून मजा आणली. दरवर्षीप्रमाणे शैला नाडकर्णी आणि पौर्णिमा गायतोंडे यानी जेवणाच्या पदार्थाच्या रुचीला ओके दिल्यावर सर्वांनी सुग्रास जेवणाचा आस्वाद घेण्यासाठी मोर्चा वळविला. कोल्हापूरी सुका, चिकन मसाला, चिकन पाव, पनीर भाजी, मिक्स भाज्यांचा कुर्मा, नान, डाळ, जीरा राईस, पापड, गुलाबजाम व जिरवणीला मठ्ठाही होताच.

मॉस रिसोर्ट प्रशस्त असल्यामुळे सर्वांना बसण्यासाठी व खेळण्यासाठी झाडांच्या सावल्यांचा आडोसाही मस्त होता. त्यामुळे कोणालाही वामकुक्षीची संधी न देता चित्रा कामतने सर्व सूत्रे आपल्या हाती घेऊन सर्वाना संगीत खुर्ची खेळण्यासाठी तयार केले. ७-८ वर्षाच्या बच्चे कंपनीपासून ८६ वर्षाच्या तरुणापर्यंत सर्वांना सामील करुन घेतले डी.जेच्या मस्त गाण्यांवर ताल धरत सर्वांची खुर्ची पकडण्याची धावपळ बघून मजा वाटत होती. अगदी सर्वाना जेवणांनंतर शतपावली घातल्याचे समाधान वाटले. हया खेळातील महिलांच्या गटात जोगेश्वरीच्या जयश्री भेडसगांवकर पहिला व दुसरा क्रमांक ठाण्यातील मोनाली नेत्रावळी हयांनी घेतला आणि त्यानंतर पुरुषांच्या संगीतखुर्चीमध्ये पहिला क्रमांक दुर्गादास गायतोंडे व मुंबईच्या सतीश कामत यांनी दुसरा क्रमांक घेतला त्यानंतर बंबार्डिंगच्या स्पर्धेत सर्वानी भाग घेऊन मजा आणली. त्यात तारा गायतोंडे, जयश्री भेडसगांवकर, चित्रा थळी, व सुरेखा पालेकर यांनी स्पर्धा जिंकली.

त्यानंतरच्या कलासादरी करण्याच्या कार्यक्रमात सहलीत सामील झालेले कवी देवदास नाडकर्णी हयांच्या चारोळी, कवितांनी रंगत आणली. वसुधा कामत, अनघा नाडकर्णी आशा वाघ, तेजश्री कुलकर्णी हया सर्वांनी अतिशय सुंदर आवाजात म्हटलेल्या आपल्या गाण्यांतून सर्वांना मंत्रमुग्ध केले. नेत्रावळी यांचे नाटयसंगीतही छान झाले. दीपा मुझुमदार व तारा गायतोंडे यांची कोकणी गाणी तर सर्वांना कारवारच्या घरांतच घेऊन गेली. याशिवाय सानवि थळी, मेधा सोहनी व सोनिया पाटकर हयांच्या पिंगा ग बाई पिंगा ह्या गाण्यांच्या नृत्यावर ठेका धरुन सर्वांनी त्यांचे कौतुक केले. वेळेच्या अभावी कार्यक्रम आटोपता घ्यावा लागला. स्पर्धेत भाग घेतलेल्या विजेत्यांचे तसेच कार्यक्रमात भाग घेतलेल्या सर्व कलाकारांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. दुपारी ४.४५ वाजता सर्वजण कांद्याची गरम गरम खेकडा भजी व चहा कॉफीची चव घेत परतीच्या तयारीला लागले.

ही सहल यशस्वी करण्यात मुंबई बससाठी राजू बोरकर, विवेक कुलकर्णी, जोगेश्वरीहून प्रसाद गायतोंडे यांचा खूप मोठा हातभार लागला. दरवर्षी सर्वांनी ठाणे मंच्याच्या सहलीस व सर्व कार्यक्रमास सहभाग घेऊन आनंद घ्यावा ही विनंती.

**सुरेखा सुरेश पालेकर, ठाणे**

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| अतीश किरण वागळे, मुलुंड | व | प्रणोति विवेक सुखटणकर, पुणे |
| आदित्य नितीन सोहोनी, बोरीवली | व | ईशा विनायक देशपांडे, बोरीवली |


नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतीच्या नियमानुसार

**'नार्थ कॅनरा जी.एस.बी. वृत्तविलास' त्रैमासिकाचे प्रकटन**

१. **प्रकाशन स्थळ :** दि नार्थ कॅनरा जी.एस.बी संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड. मुंबई-४

२. **प्रकाशन अवधी :** त्रैमासिक

३. **मुद्रक, प्रकाशक आणि संपादक :** दत्तात्रय नागेश नाडकर्णी, **राष्ट्रीयत्व :** भारतीय

पत्ता : दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई-४.

४. **मालक :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई-४.

मी दत्तात्रय नागेश नाडकर्णी, या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

**मुंबई, १ मार्च २०१७** **दत्तात्रय नागेश नाडकर्णी**- प्रकाशक

# ठाणे मंचतर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी उत्साहवर्धक शिबीर

ठाणे मंचने २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान आयोजित केलेले अलीबाग येथील नागाव गावातील नाईक कॉटेजेस मधील शिबीर खूपच मस्त झाले.

आमची बस दुपारी साधारण साडेबारा –पाऊणच्या सुमारास रिसॉर्टवर पोचली. सोमवार असल्याने सर्वांनी शाकाहारी जेवणाचा आस्वाद घेतला. दुपारच्या विश्रांती नंतर सूर्यास्त पाहुन, बर्फाचा गोळा चाखून सर्वांनी कोकणी फूड बाजारमध्ये कोकणी पदार्थांची मनसोक्त खरेदी केली. रात्रीच्या जेवणाआधी श्री. अरुण कसबेकर यांनी आपल्या खुसखुशीत शैलीत आपले अनुभव, विनोद सांगून सर्वांचे मनोरंजन केले. सर्वजण कोंकणीतुनच बोलत असल्याने, आजुबाजुचा नारळी पोफळीचा परिसर, जवळच असलेल्या समुद्राची ऐकू येणारी गाज यामुळे सर्वानाच, 'कारवारात आईल्ले असे जाले.' ठाणे मंचने मागे कारवार सहलीत समुद्र–सफरीचा योग घडवून आणला होता. यावेळी अलीबागच्या रस्त्यानी बसमध्येच नौकाविहाराचा आनंद दिला.

दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्त्यानंतर काही जणांनी चौल येथे असलेल्या दत्त मंदिराला भेट दिली. पूर्वी तेथे जाण्यासाठी आठ नऊशे पायऱ्या चढून जावे लागे आतां वरपर्यंत गाडी जात असल्याने अडीचशे पायऱ्यातच देऊळ गाठता येते. ही दत्ताची मूर्ती अतिप्राचीन असून आजूबाजूला छोटी छोटी मंदीरे आहेत. मुख्य म्हणजे उंचीवरुन देवघर व इतर गावांचा नजारा, खाडीवरचा पुल वगैरे अतिशय सुंदर असे दृष्य दिसत होते. त्यानंतर मुर वारी (मुख्य) गणपतीला भेट दिली. तेथे सर्वजण एकत्र भेटलो व जागृत अश्या महालक्ष्मी व शीतला देवी देवळात जाऊन रिसॉर्टमध्ये परत आलो. दुपारच्या जेवणाला मांसाहारी लोकांसाठी 'फ्राइड अख्खे पापलेट व सुंगटाची आमटी होती व शाकाहारी लोकांसाठीही गरमागरम कांद्याची भजी होती. दुपारी मस्त झोप काढली.

संध्याकाळी सर्वजण काशिद बीच वर गेलो. समुद्रात पाय भिजवले, फेरफटका मारला, वाळुत बसुन गप्पा मारल्या व परतताना बसमध्ये गरम वडापाव खाल्ला नंतर सालवे येथील बिर्ला मंदिराला भेट दिली. भव्य देऊळ, आजूबाजूचा स्वच्छ–सुंदर परिसर मन रिझवुन गेला. रिसॉर्टवर रात्री गप्पांचा, गाण्याचा मस्त फड रंगला. सुधा दळवी यांनी पु.ल. देशपांडे यांचा सदाशिवगडावरचा (वाघांचा) लेख वाचुन दाखविला . सुषमा मुळगावकर, शैला भद्री, चित्रा कामत, लता नायर यांनी कोंकणी कवना, गाणी सादर केली, मंगला वागळे यांनी सुरेखसे राधेचे भजन सादर केले. लता नायर यांनी गजल व गाणी सुरेलपणे सादर केली अलका वर्टी

यांनीही छान गाणे सादर केले देवीदास नाडकर्णी यांनी छान स्वरचित कविता सादर केल्या. अरुण कसबेकर यांनी विनोद सांगुन कार्यक्रमाची सांगता केली.

२२ ला सकाळी Housie खेळलो. खरी मजा आली ती Passing the Parcel ह्या खेळात. प्रत्येक चिठ्ठीत वेगवेगळा विषय होता आणि प्रत्येकीनेच अतिशय सोप्या, सुंदर शब्दात आपापला विषय रंगवून सांगितला. विशेष उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे, सुरेखा पालेकर (माझे वजन व डायट), मंगला वागळे (मानस सरोवर अनुभव) प्रभा कसबेकर (चित्रपट-निरजा, निर्माता अतुल कसबेकर, एक अनुभव), रेखा सलगर (नायजेरीया, टांझानिया येथील वास्तव्यातील रोमांचक अनुभव).

विसवणाची आमटी, विसवण फ्राय व कालवाचे सुके खाऊन परतीचा प्रवास सुरु झाला. सासवणे येथील शिल्पकार करमरकर यांच्या म्युझीयमला भेट दिली व तेथील उत्कृष्ट कलाकृती पाहिल्या. लता नायर यांनी गजल, भजन भैरवी पर्यंत अनेक गाणी उत्स्फूर्तपणे पेश केली त्यामुळे प्रवास कधी संपला ते कळलेच नाही. सर्वांच्याच चेहऱ्यावर शिबीर छान झाल्याचे समाधान दिसत होते.

**ता.क.** : ठाणे मंचतर्फे सर्वांना सुरवातीला हीट (द्रोणातील इडली) चटणी, चहा लाडू-चिवडा पॅकेटस व परतताना मेथीचे ठेपले व सांजोऱ्या देण्यात आल्या. श्री. सुरेश पालेकर यांनी ही सहल यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

**मंजिरी कुलकर्णी, ठाणे**

SHREE HOMOEOPATHIC PHARMACY

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)

# मुंबई मंचतर्फे कारवारी आनंदमेळावा

उदरभरण म्हणजे एक यज्ञकर्म असे म्हटले जाते. अन्न हा केवळ शरीरासाठी आवश्यक नित्यकर्माचा भाग नसून तो पोटातून थेट हृदयापर्यंत जोडला जाणारा मार्ग आहे. या उदरभरणाच्या निमित्ताने जिभेचे चोचले पुरवण्यासाठी योग्य ठिकाण म्हणजे कारवारी आनंद मेळावा. याची प्रचिती आली ती अस्सल खवय्यांनी मुंबई मंचातर्फे दिनांक २२ जानेवारी २०१७ रोजी जोगेश्वरी येथील के. जी. एस. हाऊसिंग सोसायटीच्या पटांगणात आयोजित केलेल्या कारवारी आनंद मेळाव्यात लावलेल्या तुफान हजेरीमुळे.

मेळाव्यातील स्टॉल्सची आकर्षक मांडणी व सभोवतालची रंगीबेरंगी सजावट लक्षवेधी ठरत होती. खाद्यपदार्थांचा खमंग सुवास आसमंतात दरवळत होता. खाण्यातील दर्दी मंडळी सुकरुंडे, अनारसे, उकडीचे मोदक, तवसळी, मांडे, चवडे असे शाकाहारी पदार्थ तसेच तिसऱ्याचे वडे, बांगडयाचे धोडक, कोंबडी-वडे, कोलंबी मसाला, सुंगटाचे लोणचे, सुक्या बांगडयाची किस्मोर इत्यादी मांसाहारी खास पदार्थ कुठल्या स्टॉलवर मिळतील याची चौकशी करीत होती. काळाच्या ओघात आणि आजच्या फास्ट-फूडच्या जमान्यात हे कारवारी पदार्थ लुप्त होत चालले आहेत. या डेलिशियस पदार्थांची चव युवा पिढीला व्हावी म्हणून मुंबई मंच गेली नऊ वर्षे सतत प्रयत्नशील आहे. रसिकांची या खास खाद्यप्रकारांसाठी मागणी एवढी असते की उशिरा येणाऱ्यांना निराश होऊन इतर पदार्थांवर समाधान मानावे लागते. या सोहळयाच्या निमित्ताने ज्ञातीतील छोट्या उद्योजकांना पापड, लोणची, सांडगे या घरगुती वस्तूंसोबत तयार कपडे, पर्सेस, साड्या, इमिटेशन ज्वेलरी व गिफ्ट आर्टिकल्सचे प्रदर्शन मांडून मार्केटिंग करायची संधी मिळते. मित्रपरिवार व नातेवाईकांच्या समवेत गप्पा-गोष्टी करताना घेतलेली पदार्थांची चव काही न्यारीच असते. तरीसुध्दा अनेकांनी खाण्याचा आस्वाद घेत खाद्येतर वस्तुंच्या स्टॉल्सना चांगला प्रतिसाद दिला.

आपल्या बँकेने यंदा त्यांच्या शताब्दीवर्षात या सोहळ्यासाठी आर्थिक प्रायोजकत्वाचे भक्कम पाठबळ दिले. बँकेचे चेअरमन श्री. किशोर कुलकर्णी तसेच त्यांचे सहकारी सर्वश्री नागेश पिंगे, लक्ष्मीकांत प्रभू व रमेश कसबेकर यांनी आवर्जून उपस्थित राहून कार्यक्रमाची प्रशंसा केली. के. जी. एस. को. ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोयायटीच्या कार्यकारिणी मंडळातील सदस्यांनी सोसायटीचे पटांगण या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन विशेष साहाय्य केले. याप्रसंगी सारस्वत बँक व पंकज क्लासेस यांचीही मदत मंचाला मिळाली. या सर्वांचेच मुंबई मंचातर्फे आभार. तसेच सर्व उपस्थित असलेल्या खवय्यांना व स्टॉलधारकांना हा सर्वांना आपलसा वाटणारा वार्षिक सोहळा यशस्वी केल्याबद्दल धन्यवाद. ज्ञातिबांधवांचा या मेळाव्याप्रती असलेला उत्साह आणि प्रेम हेच मुंबई मंचासाठी प्रेरणादायी ठरत असते.

**डॉ. विवेक कुलकर्णी, दादर**

| स्टॉलधारक | खाद्यपदार्थ / इतर जिन्नस |
|---|---|
| लता रामाणी | मोरी धबधबे, तवसळी, नाचणी-सत्व, चवडे |
| तारा गायतोंडे | मसाले, लोणची, सुके बांगडे, खरवस |
| प्रज्ञा बोरकर | तिसऱ्याचे वडे |
| विद्या कसबेकर | Chicken Frankie, उकडीचे मोदक, चहा |
| आशीष शिरोळकर | कुंदा, कडबोळी, अनारसे, मांडे व बेळगावी साड्या |
| लक्ष्मी पै | लोणची, पापड, सांडगे वगैरे खाद्य उत्पादने |
| सदाशिव वागळे | Wagle's Kitchen : Chicken / Veg. Noodles, Prawns Schezwan, तंदुरी चिकन, आंबा-डाळ, पन्हे |
| वैशाली दळवी | चिकन लॉलीपॉप, Sea-Food Biryani, खिमा पाव, पापलेट व कोलंबी फ्राय, सोलकढी |
| सुमंगला वैजप्पन | इडली (हीट) चटणी, नारळीच्या वड्या, मसाला भेळ |
| जयश्री भेडसगावकर | उंधियु, मसाले, चटण्या, इत्यादी खाद्य उत्पादने |
| वैजयंती पाटकर | Veg. Cutlet, कोलंबी पुलाव, चिकन मसाला, भाकरी, कोशिंबीर, सोलकढी |
| शाम्भवी पाटकर | Purses and Perfumes |
| वृंदा भट | कोलंबी बिर्याणी, चिकन पाव, कांदा भजी, रसम |
| देवीदास शेणॉय | कोंबडी-वडे, शेव, चिवडा इत्यादी |
| राजशेखर चव्हाण | चिकन बिर्याणी |
| महेंद्र कसबेकर | Organic Food Products |
| किशोर बोरकर | मसाला पोहे, दूध-पाक, कोकम सरबत |
| मीरा भट | Desi Delight : लोणची, पापड, मसाले, वगैरे |
| लक्ष्मी खंडेपारकर | Furnishing items |
| शीतल लवंदे | चिकन रस्सा, Omlette व खिमा पाव |
| कविता कुमार (भट) | दातांची निगा |
| गंगा सुतार | Chicken biryani and Chicken Bombs |
| दर्शन मेत्राणी | Sarees and Jewellery |
| Kunal Constructions | Construction Advertisement |
| हर्षद कामत | Wisdomkey Knowledge Service |
| पूनम रस्तोगी | Tupperware items |
| पद्मा | Temple Jewellery |
| सम्वित सुधा | Bags and purses |
| मुंबई मंच | Popcorn and Candy-Floss |

२०१६ साली श्रीमती इंदू मुझुमदार यांनी शंभरी ओलांडली तेव्हा ज्ञातीतर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला त्याचे फोटो




कुटुंबीयासमवेत : अनिल (पुत्र), लता पालेकर (कन्या)
विठ्ठल (बाळ) पालेकर (जामात)



पदाधिकाऱ्यांसमवेत : दत्तात्रय नाडकर्णी, प्रेमानंद नाडकर्णी
उभे : डॉ. विवेक कुलकर्णी, देवदास नाडकर्णी, मारुती दळवी

EXPLORE WILDLIFE SAFARIS IN ANY PART OF THE WORLD WITH ...

# NILKANTH WILDLIFE SAFARIS





**Enjoy exploring various ways to learn about conservation and importance of wildlife by experiencing the beauty of it.**

We undertake :

1. Tailormade wildlife safaris in any part of the world for groups.
2. Educational and research nature trails and wildlife camps for schools, colleges and wildlife researchers.
3. Corporate management training programmes and meetings in the well-known wildlife sanctuaries.
4. Nature club membership for students offered.

**For details contact - Dr. Mahesh N. Sanzgiri**
**Tel. : 022-26195323 / 9892157914**
**Website : www.nilkanthwildlifesafaris.com**
**Email : mnsanzgiri@hotmail.com**

शिबीरात सामील झालेल्यांचा फोटा (तपशील पृ. १३)



**उभे डावीकडून :** सुरेश वागळे, देवदास नाडकर्णी, विवेक कुलकर्णी, दुर्गादास रेगे, दामोदर बोरकर दिलीप मुझुमदार, मंजिरी कुलकर्णी, स्मिता रेगे, चित्रा कामत, विजय कामत, महारूद्र वागळे, अतुल वर्टी, मारुती दळवी, सुरेश पालेकर, जयश्री बोरकर, अजित बोरकर, अरुण कसबेकर, लता नायर

**बसलेले डावीकडून :** ज्योत्स्ना वागळे, शैला भद्री, विलासिनी बोरकर, दीपा मुझुमदार, रेखा सलगर, मंगला वागळे, अलका वर्टी, सुधा दळवी, सुरेखा पालेकर, सुषमा मुळगांवकर, प्रभा कसबेकर, शिवांगी नाडकर्णी,




अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

**मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,**
**मंगेशी, फोंडा- गोवा**



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि शोभत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर यात नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे आपल्या आयुष्यात असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मन:शांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

फ्लॅटस् उपलब्ध: 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के

प्रोजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था

a Project by:
**कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी**

मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला,
सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि: **2683 3841/47/72.** मोबा: **98336 36451**
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिस: डी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321

गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

# 'काळी ते गंगावळी' च्या पुनर्मुद्रणाच्या निमित्ताने

'काळी ते गंगावळी' हा परिसर म्हणजे यात काळी नदीच्या काठावर वसलेल्या कारवारच्या पंचक्रोशीतील गावांपासून तो अंकोल्यावरुन कुमठ्याला जाण्याच्या वाटेवर वाहणाऱ्या गंगावळी नदीवर वसलेल्या पंचक्रोशीतील गावांचा समावेश आहे. हा उल्लेख केवळ प्रतिकात्मक आहे. या सर्व कारवारकरांची मातृभाषा कोंकणी असून देखील त्यांनी गद्य-पद्य रचना मराठीत केली आहे. त्यांच्या या साहित्याची झलक या पुस्तकाच्या शीर्षकाने दर्शविली आहे आणि हेच पुनर्मुद्रित आवृत्तीच्या मुखपृष्ठाचे वैशिष्ट्य आहे.

या पुस्तकाचे पहिले प्रकाशन १९५१ साली म्हणजे सुमारे ६६ वर्षांपूर्वी अत्यंत धामधुमीच्या काळात झाले आहे. 'मुंबई बेळगाव, कारवारसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' अशा घोषणा देत संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरु झाली. ती ऐन जोमातअसतानाच कारवारमध्ये १९५१ साली मराठी साहित्य सम्मेलन भरविण्यात आले. सर्व संवेदनशील कारवारकरांना मराठी मुलुखात सामील व्हायचे होते. त्यांची नाळ कानडीहूनही अधिक मराठीशी जोडली गेली होती. आमची मातृभाषा कोंकणी ही बोलीभाषा असली तरी आम्ही मराठीतून लिहितो, व्यक्त होतो, हे त्यांना आवर्जून सांगावयाचे होते. हे पुराव्यानिशी सिध्द करण्याच्या हेतूने मराठी साहित्य सम्मेलनात 'कारवार' आणि 'काळी ते गंगावळी' ही दोन पुस्तके प्रकाशित करण्यात आली.

आज या पुस्तकांना ६६ वर्षांचा काळ उलटल्यानंतर ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या पुस्तकांच्या प्रती किंबहुना ही पुस्तके काळाच्या ओघात गडप होऊ पाहत असताना 'कारवार' हे पुस्तक सदाशिवगड येथील विदुषी सौ. उषा राणे यांनी त्याचे कोकणीत भाषान्तर करुन गेल्यावर्षी समारंभपूर्वक पुनर्मुद्रण केले आणि दुसरे 'काळी ते गंगावळी' अगदी मूळ स्वरुपांत पुनर्मुद्रण करुन ते प्रकाशित करण्याचे थोर कार्य श्री. द. ना. नाडकर्णींनी यांनी नुकतेच म्हणजे १ जानेवारी २०१७ रोजी पार पाडले आहे.

श्री. नाडकर्णी हे सदर दोन्ही पुस्तकांचे प्रकाशक स्वर्गीय शांताराम दत्तात्रय भेंडे यांचे शिष्य. त्यांनी या नव्या आवृत्तीचे प्रकाशक म्हणून अतिशय हृद्य असे हृद्गत लिहिले आहे. त्यांनी आपल्या गुरूंना, स्वर्गीय भेंडे मास्तरांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्याची संधी या प्रकाशनाच्या रूपाने मिळाली असे म्हटले आहे. मात्र या निमित्ताने आपणा ज्ञातिबांधवांस एका दुर्मिळ पुस्तकाचा लाभ झाला आहे. हे पुस्तक केवळ ऐतिहासिकच नव्हे, तर सांस्कृतिक दृष्टीने देखील महत्त्वाचे आहे.

अगदी अठराव्या शतकापासूनच्या प्रासादिक काव्यरचनांचा या पुस्तकात समावेश आहे. आध्यात्मिक, सामाजिक, निसर्गवर्णनपर इतकेच नव्हे तर पुढील काळातल्या भावरम्य (Romantic) गद्य-पद्य रचना हे या पुस्तकाचे वैशिष्टय आहे. बैलूर मठाच्या परंपरेतील संत शिवानंद हे १८ व्या शतकात होऊन गेलेले कवी; यांचे 'देवी ध्यान वर्णन' हे काव्य, हल्याळचे विद्वान कवी व्यंकट बद्री यांचे 'मांगिरीश स्तोत्र', अंकोल्यातले इ. स. १७६६ च्या सुमारास

लेखन करीत असलेले कवी 'सुभानंत' पिकळे यांचा 'भीष्मपर्व-अध्याय २९' हा काव्य उतारा, कुमठयाजवळच्या नाईक स्वामींचा 'झुलवा', भटकळ अप्पय्या यांचे गेय असे 'पद' अशा प्रासादिक स्तोत्र रचना यात आहेत.

१९ व्या शतकातल्या महिलाही अशाप्रकारच्या प्रासादिक काव्य रचनेत मागे नाहीत. शांताबाई नाडघर यांचे 'दत्तस्तवन', पद्मावती भटकळकर यांचे 'युद्धांत कैकेयीची कामगिरी', राधाबाई लाजमी यांची 'हंसगीता' (वेंचे) या कविता सुंदर तर आहेतच पण ज्या काळात स्त्रियांना लिहिण्या वाचण्याची मारामार, पुढयात ठेवलेले कामाचे डोंगर, बाळंतपणे अशा परिस्थितीत केलेल्या प्रासादिक रचना वाचून थक्क व्हायला होते. नंतरच्या काळातल्या म्हणजे या पुस्तकाच्या प्रकाशन काळात ऐन उमेदीत असलेल्या इंदिरा तेलंग, अनसूया बोरकर, कुंदा गायतोंडे यांच्या समकालीन कविता देखील वाचनीय आहेत.

वामन मंगेश दुभाषी (ऋग्वेदी) यांची 'कर्मयोगी' ही कविता त्यांच्या सुधारक विचारांमुळे विशेष उल्लेखनीय वाटते. आनंद नाडकर्णी यांची 'गुरु-शिष्या संवाद' कारवारकरांचा कुचिंद्रीपणा दाखवून देते. 'शरद' या टोपण नावाने लिहिणारे लेखक आणि कवी म्हणजे त्याकाळातले सामाजिक कार्यकर्ते आणि सुप्रसिध्द डॉक्टर आनंद मुझुमदार यांची भावरम्य कविता 'स्वप्नमय सागरवेला' (कोंकणीत समुद्रावेळ) अशा सुंदर कविता या संग्रहात आहेत. अशाप्रकारे ईश्वरभक्ती आध्यात्म यांच्यापासून सुरु झालेला मराठी काव्यप्रतिभेचा प्रवास पुढे पुढे सामाजिकतेपासून देशभक्ती आणि पुढे तो भाव रम्यतेकडे येऊन (Romanticism) ठेपतो.

आता गद्य उताऱ्यांकडे वळूं या. डॉ. कैकिणींचे 'प्रास्ताविक' हे साहित्य सम्मेलनात केलेले प्रासंगिक भाषण हे केवळ भाषण नसून साहित्य रसास्वादाची मेजवानी आहे. वैद्यकशास्त्राचे, त्यातून 'बाळंतपणाचे', डॉक्टर असून त्यांचे इतिहास, सौंदर्यशास्त्र, संस्कृत, उर्दू भाषांवरील प्रभुत्व या भाषणातून दिसून येते. त्यांनी सांगितलेले अनेक किस्से, त्यांचे पहिल्या महायुध्दातील सहभागातील रोमांचकारी अनुभव हे सर्व मनोरंजक आहेत. त्यांचा 'नाथपंथीयांचा संप्रदाय' हा लेख देखील उल्लेखनीय आहे. तसेच स्वर्गीय मंगेश तेलंग (सतार मंगेशमाम) यांचा 'वेदान्तशास्त्र' आणि दुभाषी मास्तरांचा (ऋग्वेदी) 'दक्षिणी सारस्वत' हे लेख देखील अभ्यासपूर्ण आणि वाचनीय आहेत. श्रीमती प्रेमा कंटक या सुप्रसिध्द गांधीवादी समाजसेविका यांचा 'तपस्वी अबू तोराब' हा लेखही कुतूहलजनक आहे.

यानंतरचा सर्व भाग म्हणजे निरनिराळया लेखकांच्या लघुकथा. काळाप्रमाणे लघुकथेचे स्वरुप कसे पालटत गेले ते या कथावस्तूतून दिसून येते. काही कथा (उदा. लीलाग्रज यांची 'मॅग्नेलिया') हृदयस्पर्शी आहेत, तशाच खुसखुशीत अशा विनोदी कथाही आहेत. कथालेखकांची नांवे कारवारकरांना परिचित अशीच आहेत. डॉ. अ. वा. वर्टी यांची 'मोटारमामा', पु. ल. देशपांडे यांची 'दोन आत्म्याचा माणूस', दत्तू बांदेकरांची 'राजकारणी पोपट', ज्ञानेश्वर नाडकर्णीची 'पाऊस' या सर्व त्याकाळी देखील प्रसिध्दीस पावलेल्या लेखकांच्या कथा तर आहेतच; त्याचप्रमाणे आपल्या परिचितांपैकी गोविंद वाघ, 'शरद' या

टोपणनावाने गद्य-पद्य लेखन करणारे डॉ. आनंद मुझुमदार, इंदिरा तेलंग, मीरा नाडकर्णी यांच्या कथाही वाचनीय आहेत.

इ. स. १९५१ म्हणजे या काळात कारवारमध्ये वीजसुध्दा आली नव्हती. दळणवळणाची साधने अपुरी. त्यामुळे प्रवास तसा खडतरच असायचा. लौकिकदृष्टया कारवार मागासलेले राहिले होते. कानडीचा जोर वाढविण्यात येत होता. अशा अवस्थेत मराठी वाचनालये अद्ययावत ठेवणे मराठीवाङ्‌मयमंडळात विद्वत्तापूर्ण व्याख्याने घडवून आणणे अशा गोष्टी कारवारमधील आपल्या कार्यकर्त्यांनी हिरीरीने केल्या त्याचेच एक प्रतीक म्हणजे हे 'काळी ते गंगावळी' पुस्तकाचे संपादन आणि प्रकाशन. त्याकाळी स्वर्गीय शांताराम भेंडे यांनी परिश्रमपूर्वक अठराव्या शतकापासून ते १९५१ पर्यंतचे गद्य-पद्य वेंचे जमवून त्याचे सर्वसमावेशक असे पुस्तक तयार केले असा हा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक साहित्य ठेवा काळाच्या पडद्याआड जाऊ नये म्हणून कै. भेंडे मास्तरांचे पुत्रद्वय दत्तात्रय (चंद्रकांत) व किशोर भेंडे आणि श्री. द. ना. नाडकर्णी (भेंडे मास्तरांचे शिष्यवर) यांनी आपल्यासमोर पुन्हा एकवार प्रकट केला, त्यांचे अभिनंदन.

ता. क. : या पुस्तकातील जुन्या काळच्या जाहिराती ६० वर्षांपुढील ज्येष्ठ नागरिकांना कारवार आणि मुंबईमधील संस्थांच्या जुन्या आठवणी जागवून देतील.

**शैलजा मंगेश नाडकर्णी, शिवाजी पार्क, मुंबई**
२४४४५६४५

**('काळी ते गंगावळी' उपलब्ध : द. ना. नाडकर्णी, पारले, २६१२४१६२)**

## विजूले चुटकुले

| | | |
|---|---|---|
| भूमिती शिकयतली बाई | : | अरे मंगेश, रेखा आणि बिंदू हातूत किते फरक आसा? |
| मंगेश | : | रेखा ही सिनेमातली नायिका आणि बिंदू ही खलनायिका |
| डॉक्टर पेशटाक | : | तुका लोकल अेनेस्थेशिया दिल्यार जायतं? |
| पेशंट | : | तुमी पैशाची काळजी करनाकात. इम्पोर्टेडच अेनेस्थेशिया दियात |
| युसुफ | ; | तुजे सकल कित्ले लोक आसात? |
| इस्माईल | ; | सुम्मार तीनशे. हाव कब्रस्तानांत काम करता |

विजय सदानंद वागळे, ठाणे
(९२२१६०७५७७)

## श्री मंगेशाची आरती

श्री मंगेश माहात्म्य

जयदेव जयदेव जय जय मंगेशा।
सुखदात्या कुलदेवा जय मांगिरीशा।। धृ।।
प्रेमळ लोमेशशर्मा भक्तांचा त्राता।
सन्मुख श्रीपुरुषोत्तमा बहुभाग्यदाता।।
सान्निध्यी शिवशर्मा संसारी नेता।
स्वकुलास्तव गोमांतकि वससी भवनाथा।।१।।
शांतादुर्गा पाळी पोषी भक्तांना।
महालक्ष्मी मातेपरि सांभाळी त्यांना।।
सदया महालसाही रक्षी सकलांना।
दिव्य अशा शक्ती या प्रकटल्या नाना।।२।।
वैराग्या आनंदा ठाव तुझ्या ठायी।
निवृत्तिप्रवृत्ति लोळति तव पायीं।
रुद्रस्वरूप शिवमय शंकर सुखदायी।
प्रगटुनियां भक्तांते पावसि लवलाही।।३।।
मुलकेश्वर संकटी धांवत ये वेगें।
साह्य करी भक्तां जे पिडिले भवरोगें।।
भक्तांस्तव रात्रंदिन प्रेमभरें जागे।
नित्य करी संरक्षण राहुनियां मागे।।४।।
जयजय महालसे श्रीमहालक्ष्मी माते।
जय पुरुषा शिवशर्मा जय देवी शांते।।
जय जय लोमशशर्मा जय दे आम्हांते।
मुलकेश्वर मंगेशा रक्षीं बाळां तें।।५।।
सारस्वत कुलवर्धक संरक्षक देवा।
बाळावरि करुणाघन प्रेमे वर्षावा।।
प्रपंच परमार्थाचा लाभ तया व्हावा।
अर्पी वामन पायी निष्काम सेवा।।६।।

श्री मंगेश माहात्म्य

बहुतेक आरतीसंग्रहामध्यें गणपती, शंकर, श्रीदेवी, दत्तात्रय, मारुती, विठ्ठल, श्रीकृष्ण इत्यादी देवदेवतांच्या आरत्या जास्त प्रचलित आहेत. आपल्या बहुतेकांचा कुलदेव म्हणजे श्रीमंगेश पण श्रीमंगेशाची आरती प्रचलितांमध्ये नाही. ही उणीव भरुन काढण्याचा हा प्रयत्न. ही आरती प्रकांड पंडित श्री. वामन मंगेश दुभाषी ऊर्फ ऋग्वेदी यांनी रचली होती. ती कोणत्या संग्रहात प्रसिध्द झालेली याची माहिती नाही. ही आरती त्यांचे पणतू पारल्याचे श्री. वामन (किरण) भालचंद्र दुभाषी यांनी उपलब्ध करुन दिली.

(प्रायोजन सौजन्य : किरण दुभाषी)

# प्रतिक्रिया
## श्री मंगेशाची आरती

मुखपत्रिकेतल्या गेल्या अंकातील ती. वामन मंगेश दुभाषी उर्फ ऋग्वेदी विरचित 'श्री मंगेशाची आरती' हे वाचून आमच्या लहानपणींच्या सुखद आठवणींना उजाळा मिळाला. दुभाषी, देशपांडे (पु.लंचे वडील) व आम्ही भेंडे कुटुंबीय यांचे बंगले पारल्याला शेजारीच होते. आता तेथे टोलेजंग इमारती झाल्या आहेत. वामनअण्णा आमच्या पांडीत अण्णा म्हणूनच ओळखले जात. आमच्या अंगणांतून कुंपण पार केले की दुभाषी निवासाच्या परसदारी पोंचता येई. सर्व प्रथम प्रवेश अण्णांच्या हॉलमध्ये होई. त्यांचा वावर त्याच खोलींत असे. त्याच ठिकाणीं चवतीच्या वेळी मूर्तीची स्थापना, पूजा अर्चा, आरती प्रसाद असा कार्यक्रम असे. तयीची पूजा व दीड दिवसाची पूजा यामुळे परिसरांत एक प्रकारचे चैतन्य निर्माण होत असे. अण्णांचे ज्येष्ठ चिरंजीव मंगेश मामा ऊर्फ भाऊमामा पुरोहिताचे कार्य करीत असत दुसरे चिरंजीव महारुद्रमामा (किरणचे आजोबा) पूजेची पटी (पुस्तक) वाचून दाखवायचे तिसरे नारायणमामा (सतीश दुभाषी यांचे वडील) इतर व्यवस्था बघत. आरतीची वेळ झाली की नारयणमामा झगाट वाजवून इशारा देत. मग आम्ही आमच्या बंगलीतून पळतपळत आरतीला हजेरी लावत असू. सर्व आरत्या अगदी कारवारी ढंगात म्हटल्या जात. 'आऽऽ रती सप्रेऽऽम जयजय विठ्ठल पर ब्रह्म! भक्त संकटी नानाऽऽऽऽ' वरुन आकार लागला की कोणाचा श्वास अधिक टिकतो याची ओढाओढ सुरु व्हायची. शेवटी 'देवे' म्हणजे सगळयांत आनंदाचा भाग. देवे म्हटल्यावर क्षणभर शांतता होई. मग 'यानि कानि च पापानि' म्हणून झाल्यावर 'घालीन लोटांगण' ही प्रार्थना होई. त्यावेळी आम्ही मुलं अक्षरश: दंडवत घालत असू. अशा प्रकारच्या खणखणीत आवाजांत म्हटलेल्या आरत्या अजूनही कानांत घुमतात. पु. लं. च्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकांत 'हरीतात्या' या व्यक्तिचित्रांत या आरतींचे खुमासदार वर्णन आहे. अण्णा मध्येंच श्रीमंगेशाची आरती जोशात म्हणत. कारवारी पध्दतीचा तीर्थप्रसाद (पिठी पंचकताय) सर्वांना दिला जाई. त्यानंतर सर्व बालगोपाळांना घेऊन दोघे मामा शेजारील बहीण कमलाक्का (पु. लं. ची आई) यांच्याकडे जात असू. तेथेही आम्ही मुले दणक्यात आरती म्हणत असू. नंतर प्रसाद मटकावीत आनंदाने आपापल्या घरी जात असू. वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत दरवर्षी असाच कार्यक्रम होत असे. कालांतराने यात खंड पडला पण अण्णांच्या घरच्या पूजेचे पारंपरिक संस्कार माझ्या पुढच्या जीवनावर जे प्रभाव करुन गेले त्याचा विसर पडला नाही.

**परशुराम (राम) भेंडे, पारले**

## एवढीच माझी इच्छा !

शाळेतली S.S.C. पर्यंतची ५ वर्षे मी कारवारला आजी आजोबांकडे होतो. हिंदू हायस्कुल कारवारहून १९५४ साली शालेय शिक्षण पूर्ण केले आणि पुढील शिक्षणाकरिता मुंबईला आलो. आम्ही दोन वर्षातून एकदा तरी श्री. शांतादुर्गेच्या दर्शनाला गोव्याला जात असूं. कमीत कमी अभिषेक-नैवेद्य, कुंकुमार्चन हे विधी देवळात करावयाचो. देवीचा निरोप घेताना निरोपाचा नारळ ती. आजोबा देवी पुढे ठेवायचे व सध्याचे आमचे पुरोहित श्री. कुमार सरज्योतिर्षीचे आजोबा श्री. विनायक सरज्योतिषी देवी पुढे 'सांगणी' करायचे. सांगणीचा पूर्ण तपशील मी काही येथे देत नाही. कारण माझ्या GSB बांधवांना याबाबत पूर्ण माहिती आहे. थोडक्यात आमचे आरोग्य, ऐश्वर्य, मन:शांती, सर्व प्रकारच्या परीक्षेत पूर्णपणे उज्ज्वल यश, आमच्या पूर्वजांच्या आत्म्यांना शांती, कोणी कसलीही वाईट करणी आमच्या विरुध्द केलेली असल्यास तू तुझ्या पायाखाली तुडवून टाक अशी देवीला विनंती वगैरे वगैरे... ही सांगणी बराच वेळ चालायची. एवादी महत्वाची खाजगी गोष्ट उदा. लग्न, मुंज, बाळंतपण, नवीन नोकरी, कामधंद्याकरिता भांडवल, एखादा मोठा प्रोजेक्ट असेल तर त्याकरिता सांगणीमध्ये समावेश करण्यासाठी भटजींना खास पूर्वसूचना दिल्या जायच्या. आम्ही सर्व भक्तीभावाने डोळे मिटून भटजींनी केलेली सांगणी अगदी मनोभावे एकायचो व सांगणी संपताच मोठया कृतार्थ आणि शांत मनाने देवळातून बाहेर पडायचो. जणू आमच्या सर्व काळज्या पूर्णपणे मिटल्या असून आम्हाला फक्त पुढील उज्ज्वल भविष्याची फळे चाखायचीच बाकी आहेत, असो! गेली ६० वर्षे सरासरी दोन वर्षांतून एकदातरी आम्ही कवळ्याला श्री. शांतादुर्गेच्या देवळात नियमीत जातो. पण या 'सांगणी' मध्ये कधीच बदल झालेला नाही. फक्त पुरोहित बदलले. पूर्वी श्री. विनायक भटजी होते, नंतर शांताराम भटजी आले व आता त्यांचे चिरंजीव श्री. कुमार आमचे पौरोहित्य समर्थपणे सांभाळत आहेत. पण मला मात्र काही गोष्टी खटकत आहेत. कदाचित माझ्या शैक्षणिक जीवनात गणित विषयाला प्राधान्य दिल्यामुळे असेल. सतत एकच विचार मनात येतो की मी आवळा देऊन देवीकडून कोहळा काढण्याचा प्रयत्न करीत आहे. जास्तीत जास्त एक तास गाभाऱ्यामध्ये केलेल्या पूजेबद्दल मी देवीकडून जरा अतीच अपेक्षा करीत आहे.

श्री देवीकवच मध्ये सुध्दा आपण देवीकडे किती प्रकारच्या कवचांची मागणी करतो. पायाच्या नखापासून डोक्याच्या केसापर्यंत एकही अवयव सोडलेला नाही. या देवी-कवचानुसार, जो हे कवच वाचतो तो या पृथ्वीतलावर महान व अतुलनीय ऐश्वर्याचा उपभोक्ता बनतो. इतकेच नव्हे, हे सर्व सुख उपभोगल्यावर त्याला भगवती महामायेच्या कृपा प्रसादाने, देवांनाही दुर्लभ असे श्रेष्ठ स्थान मरणोत्तर मिळते. अबब! केवळ पाच मिनिटांच्या, ।। श्री देव्या: कवचम् ।। च्या वाचनाने केवढे हे अगणित फायदे! तेही जन्मजन्मांतराचे!

श्री अर्गला स्तोत्रामध्ये तर, सारखे सारखे, तब्बल २१ वेळा - रूपं देहि, जयं देहि, यशो देहि, द्विषो देहि म्हणजे - हे देवी, मला रूप दे, जय दे, यश दे, इतकेच नव्हे तर, माझ्या सर्व शत्रुंचा नाश पण कर.

श्री कीलकस्तोत्रामध्येही यश, आरोग्य, धन प्राप्तीसाठी बरेच शॉर्टकटस् सांगितले आहेत.

या सर्वांवर कडी केली आहे सिध्दकुंजिका स्तोत्राने. आपल्याला चण्डीकवचाचा पाठ करावयाचा नसेल, अर्गलास्तोत्र म्हणावयाचे नसेल, कीलकरहस्य, सूक्तही म्हणावयाचे नसेल, ध्यान, तथा न्यासही करावयाचे नसतील, एवढेच काय पण पूजाही करावयाची नसेल तर केवळ कुंजिकास्तोत्राच्या जेमतेम दोन मिनीटांच्या पठणामुळे सप्तशतीच्या पाठाचे फळ प्राप्त होते. तसेच हे स्तोत्र अत्यंत गोपनीय असून देवांनाही दुर्लभ आहे. इतकेच नव्हे तर या स्तोत्राच्या पठणाने जारण, मारण, मोहन, वशीकरण, स्तंभन व उच्चाटन इत्यादी कार्ये सिध्दीस जातात. माझे अगदी प्रांजल मत आहे की, माणसाच्या स्वार्थाला काही सीमाच नाही.

देवीने माझे खूपच कल्याण केले आहे. सर्व सुखे भरपूर दिली आहेत. द्विधा मनस्थितीत असताना मला उत्तमप्रकारे मार्गदर्शन केले आहे. पण एवादी गोष्ट जरा मनाविरुध्द झाली तर मन देवीवर कातावते आणि हीच गोष्ट मला अचंबित करते आणि माझं गणिती मनच मला प्रश्न विचारु लागते की, तुझी देवीबद्दलची रागाची भावना उत्पन्न होण्याचे दु:साहस तू कसे करु शकतोस! कुठल्या अधिकारावर! आणि खरोखरच माझा स्वार्थीपणा माझ्या लक्षात येतो आणि मी अतिशय शुध्द मनाने देवीची क्षमा-याचना करतो.

काही वर्षापूर्वी माझे परममित्र, प्रख्यात आर्किटेक्ट कै. श्री. प्रकाश शेटगिरींच्या ऑफीसमध्ये गेलो असताना त्यांच्या ऑफीसमध्ये लावलेल्या रवींद्रनाथ टागोरांच्या प्रार्थनेकडे लक्ष गेले आणि माझे सर्व विचारच बदलले. ती प्रार्थना खालीलप्रमाणे आहे -

विपत्तीमध्ये तू माझे रक्षण कर ही माझी प्रार्थना नाही.
विपत्ती मध्ये मी भयभीत होऊ नये एवढीच माझी इच्छा.
दु:ख तापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचं
तू सांत्वन करावंस अशी माझी अपेक्षा नाही.
दु:खावर जय मिळवता यावा एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही तर
माझं बळ मोडून पडू नये एवढीच माझी इच्छा.
जगात माझं नुकसान झालं केवळ फसवणूकच
वाट्याला आली तर माझं मन खंबीर रहावं
एवढीच माझी इच्छा.
माझं त्राण तू करावंस, मला तारावंस ही माझी
प्रार्थना नाही. तरुन जाण्याचं सामर्थ्य
माझ्यात असावं एवढीच माझी इच्छा.

माझं ओझं हलकं करुन तू मला सांत्वन
दिलं नाहीस तरी माझी तक्रार नाही.
ते ओझं वहायची शक्ती मात्र माझ्यात
असावी एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखून काढीन.
दु:खाच्या रात्री सारं जग जेव्हा
माझी फसवणूक करील तेव्हा तुझ्याविषयी
माझ्या मनात शंका निर्माण होऊ नये
एवढीच माझी इच्छा.

- रवींद्रनाथ टागोर

तेव्हापासून मी देवीकडे फक्त खालील गोष्टींचीच मागणी करतो.

हे माते शांतादुर्गे मला धैर्य दे, स्थैर्य दे, आत्मशक्ती दे!
आणि तुझ्या चिरंतन भक्तीचा आशीर्वाद दे!!
एवढीच माझी इच्छा!!!

अरुण भास्कर कसबेकर
९८२०२९१३६५


# YOGESH D. WAGLE

YOUR ONE STOP SHOP FOR

| | | |
|---|---|---|
| • HEALTH INSURANCE | • GENERAL INSURANCE | • LIFE INSURANCE |
| • PERSONAL LOAN | • CAR LOAN | • HOUSING LOAN |
| • BUSINESS LOAN | • MORTGAGE LOAN | |

**WE OPERATE PAN - INDIA**

**Mob. : 9901521411**

Email : yogeshwagle.karwar@gmail.com, yogeshwagle1975@rediffmail.com,

## सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील आमचा आगळा कट्टा

सध्या ठिकठिकाणी अत्रे कट्टा, जेष्ठ नागरीक कट्टा इत्यादी अनेक कट्टे आहेत. तसा आमचाही एक कट्टा आहे. 'Morning Walkers कट्टा' म्हणा ना! सकाळी आमच्या सोसायटीच्या सर्कलमध्ये आम्ही मैत्रिणी फिरतो व दमलो की इथल्या बाकावर बसतो. हाच आमचा कट्टा. इतर कट्ट्याप्रमाणे इथेही वेगवेगळे विषय हाताळले जातात.

अर्थात आम्ही सर्वजणी जेष्ठ नागरीक आहोत. इथे आम्ही वेगवेगळया विषयावर गप्पा (चर्चा) करतो. अगदी वर्तमानातलं जीवन (जगणं) व पूर्वीचं जीवन यातील फरक, शिक्षण पध्दती, मुले, रोजच्या बातम्या, T. V. सिरीयल, एखादे चांगले पुस्तक, लग्नासाठी स्थळे इ. विषय असतात. हल्ली गुडघे दुखीचे प्रमाण वाढल्याने कुणी त्यावर औषध सांगते, कुणी खोकल्यावर उपाय सांगते आणि त्याशिवाय कुणी एखादी एखादा पदार्थ करुन डब्यातून सर्वांसाठी घेऊन येते. मग सर्वजणी तिच्या पदार्थाची तोंड भरुन स्तुती करतात व तिच्या कडून रेसिपी विचारुन घेतात. सोसायटीत एखादी घटना घडली तर तीही आम्हाला इथेच कळते.

एखाद्या दिवशी एखादी आली नाही तर लगेच तिला फोन करुन विचारपूस केली जाते. याच ठिकाणी आमची मनंही मोकळी होतात. एखादी नसेल तर इतरांना चुकल्या सारखे होते. खर सांगायचं तर मीही याठिकाणी बऱ्याच गोष्टी शिकले.

इथेच मग पिकनिकला जाण्याचा किंवा वाळकेश्वरच्या देवळात जाण्याचा बेत ठरवला जातो. पण यात आम्ही सोसायटीतल्या इतरांनाही सामील करुन घेतो व बस ठरवून जाऊन येतो. कधी एखादा कार्यक्रम किंवा नाटक अशा ठिकाणी जाण्याचाही बेत आम्ही ठरवतो.

काही जणांना वाटतं की आम्ही तिथे गप्पा मारायला येतो. पण फिरुन झाल्यावरच आम्ही तिथे बसतो व आमच्या गप्पा ज्ञानात भर घालणासाठी व मन हलकं करण्यासाठी उपयुक्तच असतात. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या उक्तीनुसार आम्ही त्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतो झालं. पण हा कट्टा आम्हा सर्व जणींना आनंद देणारा असाच आहे.

**सौ. सुहासिनी अ. वर्टी, जोगेश्वरी (पूर्व)**
२८३४८७५०

## श्री. गुरुनाथ स्थळेकर यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्ताने

मी कु. अरुणा गुरुनाथ स्थळेकर. माझे वडील श्री. गुरुनाथ गणपती स्थळेकर यांची २८ मार्च २०१७ रोजी पाहिली पुण्यतिथी. वयाच्या ८९ व्या वर्षी मुलुंड येथील निवासस्थानी त्यांचे देहावसान झाले. माझ्या बालपणापासूनच्या त्यांच्या सहवासात बऱ्याच कडूगोड संमिश्र आठवणींचे अनुभव घेतले व त्यांची स्मृती काळजावर कायमस्वरुपी कोरली गेली आहे. त्या आठवणींचे सिंहावलोकन करण्याच्या उद्देशाने काही ओळी लिहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्याचा एक नाजुकसा यत्न.

माझ्या वडिलांचा जन्म १७ जून १९२७ रोजी अंकोला गांवी झाला. एकूण भावंडे

नऊ. माझ्या एका आत्यानंतर माझे वडील व त्यानंतर इतर सर्व भावंडे पाठच्या भावंडांना मार्गी लावण्याची जबाबदारी स्वीकारण्यात त्यांनी सदैव पुढाकार घेतल्याने ते आपल्या आईचे (माई) अतिशय लाडके झाले. आम्ही उन्हाळ्याच्या सुट्टीत गावी गेल्यानंतर तिथून परतताना मायलेकरांना गहिवरुन येऊन अश्रूंचा बांध फुटला नाही; अशी एकही खेप गेली नाही. मध्यरात्री एक-दीड वाजेपर्यंत अंथरुणावर पडल्या-पडल्या मायलेकरांच्या गप्पागोष्टी चालत.

माझे आजोबा म्हणजे वडिलांचे वडील प्राथमिक शाळा शिक्षक. पगार बेताचा त्यामुळे ११ जणांच्या कुटुंबात बालपण हलाखीचे गेले व काटकसरीने व्यवहार करायची सवय लागली इतर भावंडे त्यांना 'भाऊ' म्हणत. भाऊ सर्व भावंडांमध्ये ज्येष्ठ असल्याने त्यांनी आपल्या सर्व धाकट्या भावंडावर नेहमीच प्रेमाची पाखर घातली व प्रत्येकजण १९-२० वर्षांचे होत असतानाच आपल्या कुवतीनुसार प्रत्येकाला स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी मार्गदर्शन व प्रयत्न केले. स्वत:ही वयाच्या १९ व्या वर्षी अंकोला सोडून मुंबईला आले व मामाच्या (आपा पिकळे) सोबत राहून सुरवातीला एलफिन्स्टन कॉलेजमध्ये कारकुनी पदावर नोकरी धरली. त्यानंतर काही दिवसांनी आपल्या बँकेत ९ महिने कारकुनीची नोकरी केली त्यानंतर आत्मविश्वास व मेहनतीने मॅट्रिक उतीर्ण झाले. पुढे महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागात ते रुजू झाले. त्या निमित्त त्यांना मुंबईशिवाय औरंगाबाद, अमरावती, बुलढाणा, नागपूर इत्यादी ठिकाणी अनेक उपविभागांत काम करण्याची संधी मिळाली. शेवटी १२ ऑगस्ट १९८५ रोजी शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयात शिष्यवृत्ती विभागात ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करुन ३० जून १९८६ रोजी निवृत्त झाले.

आयुष्यात लहान वयापासून जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागल्याने माझ्या वडिलांचा स्वभाव अतिशय कणखर व स्पष्टवक्ता होता आणि काही वर्षे बदलीच्या ठिकाणी जाऊन स्वतंत्रपणे राहिल्याने त्याला स्वावलंबनाची जोड लाभली. निवृत्त झाल्यानंतरही काही वर्षे त्यांनी राहत्या जागेच्या सोसायटीसाठी खजिनदार म्हणून काम केले. त्यांचा स्वभाव गप्पिष्ट असून सर्वांशी पुढाकार घेऊन नातेसंबंध जोडण्याची त्यांची खासियत होती. माझ्या लहानपणी औरंगाबादला वास्तव्य असताना त्यांच्याबरोबर पवनचक्की, अजिंठा-वेरुळ लेणी ही प्रेक्षणीय स्थळे पाहिलेली अजूनही माझ्या स्मरणात आहेत. जुनी नाणी जमवण्याचा त्यांचा बालपणापासूनचा छंद होता. टापटिपीची त्यांना आवड होती. आपल्या आयुष्यातील अनुभवांचा संग्रह व लिखाण करुन त्यांनी वयाच्या ७५ व्या वर्षी आत्मचरित्राचे प्रकाशन करवून घेतले. ते वाचतानां त्यांच्या चिकाटी प्रवृत्तीचे पैलू उलगडत जातात.

माझी आई 'इंदुमती' हिनेही तब्बल ५६ वर्षांच्या वैवाहिक जीवनात शांत, संयमी आणि निरपेक्ष वृत्तीने माझ्या बाबांना साथ दिली. संसाररूपी जीवनप्रवाहात सर्वस्वाने झोकून देणाऱ्या माझ्या वात्सल्यमूर्ती आईस माझे शतश: प्रणाम आणि आत्मनिर्भर, स्वयंभू व्यक्तिमत्त्वाच्या माझ्या वडिलांना त्यांच्या प्रथम स्मृतीदिनी माझे कृतज्ञतापूर्वक अभिवादन

**(प्रायोजित)**

**अरुणा गुरुनाथ स्थळेकर, मुलुंड**
(०२२-२५६५३१६३)

## निधन

| | | |
|---|---|---|
| तारा त्रिंबक धुमें | (बाड) | दादर |
| शिवराम (कमलाकर) विश्वनाथ गायतोंडे | (हळगे) | गोरेगांव |
| उदय रघुनाथ कसबेकर | (कडवाड) | ठाणे |
| विश्वंभर त्रिंबक कसबेकर | (कडवाड) | पारले |
| मनोहर त्रिंबक कसबेकर | (कडवाड) | गोरेगांव |
| श्रीकांत विठ्ठल कसबेकर | (कडवाड) | नलासोपारा |
| अजित विश्वेश्वर कसबेकर | (कडवाड) | न्यू जर्सी |
| महेश भुजंग कुलकर्णी | (अवर्सा) | पारले |
| अशोक सदाशिव कुलकर्णी | (हळगे) | अंधेरी |
| रमाकांत विश्वंभर मुझुमदार | (अंकोला) | कोल्हापूर |
| इंदू कमलाकर नाडकर्णी | (अगळी) | कुर्ला |
| गुरुनाथ मर्तोबा नाडकर्णी | (सांवरपै) | अंधेरी |
| वीणा (अरुणी) अरविंद नाडकर्णी | (मिटबंदर) | अमेरिका |
| लीला गोविंद (डेन्टीस्ट) नाडकर्णी | (अंकोला) | पुणे |
| सुरेन्द्र दत्तात्रय पालेकर | (कडवाड) | आस्ट्रेलिया |
| शैलजा महाबळेश्वर फेणाणी | (चेंडीये) | मालाड |
| ज्योती प्रदीप तेलंग | (हळदीपूर) | पुणे |
| जगदीश पांडुरंग वाघ | (सदाशिवगड) | पुणे |
| उषा प्रभाकर वागळे<br>(पूर्वाश्रमीच्या उषा दिगंबर नाडकर्णी) | (बसुणगे) | पारले |
| नीला दुर्गादास वागळे | (बाड) | ग्रांटरोड |
| मंगला शिवानंद वागळे | (माजाळी) | पुणे |
| नीला सुधीर वर्टी | (सदाशिवगड) | ठाणे |

**Best Compliments from**

# GANESHA YOGA & WELLNESS

Exploring Beyond Body and Mind®

**करावी मनाची धारणा, नित्य योग आणि साधना।**

आई आणि पप्पानी दिलेला आध्यात्मिक वारसा अमूल्य आणि अमाप आहे.
त्यामुळेच आज आम्ही योग साधनेतून समाजसेवा करु शकत आहोत.

Conducting Ashtanga Yoga Sessions since 2009

गिरीश महाबळेश्वर शानभाग (RYT) पद्मजा गिरीश शानभाग (RYT)

Email-girishaum@gmail.com www.ganeshyoga.weebly.com

5563 Brenchley Ave., Mississauga, ON, CANADA

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

उल्लेखनीय देणग्या

## श्री. सुरेन्द्र भालचंद्र वाघ यांच्यातर्फे तीन लाख रुपयांची देणगी

अंधेरी येथे राहणारे श्री. सुरेन्द्र भालचन्द्र वाघ यांच्या पत्नी श्रीमती माधुरी यांचे दहा वर्षापूर्वी दु:खद निधन झाले. त्यांच्या पुण्यतिथी प्रसंगी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचे पती श्री. सुरेन्द्र व मुले अक्षय व अक्षता यांनी अलीकडेच तीन लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यांतील प्रत्येकी एक लाख रुपये वैद्यकीय साहाय्य निधी, वृध्दसेवानिधी व एज्युकेशन सोसायटी यांच्यासाठी आहे.

## श्री. शरद सलगर यांच्या स्मरणार्थ यंदाही १ लाख ६३ हजार रुपयांची देणगी

सदाशिवगड शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टान्झानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करुन चांगले नांव कमविलेले श्री. शरद सलगर यांचे २०१२ साली दु:खद निधन झाले. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतिवर्षी पतीच्या स्मरणार्थ संघाच्या समाजसेवा निधीसाठी, वृध्दसेवानिधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी ५१ लाख याप्रमाणे एकूण १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी देतात. यंदाही त्यांनी अशाच प्रकारची देणगी दिलेली आहे. त्याशिवाय त्यांनी ठाणे मंचासाठी १० हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## श्रीमती कुसुम व श्री. विठ्ठल (मधु) कसबेकर यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला ५१ हजार रुपयांची देणगी

सुमारे ६० वर्षापूर्वी आपल्या एज्युकेशन सोसायटीचे कार्यक्षेत्र जेव्हा झपाटयाने वाढले तेव्हा पैशाची खूपच गरज होती. त्यावेळी ज्या सेवाभावी व दीर्घोद्योगी स्वयंसेवकांनी सातत्याने कित्येक वर्षे घरोघरी जाऊन वर्गण्या गोळा करण्याची जिवापाड मेहनत घेतली त्यापैकी जोगेश्वरी येथील श्री. विठ्ठल (मधु) गोविंद कसबेकर हे एक. त्यांच्या निरलस कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून एज्युकेशन सोसायटीने त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करुन घेतले होते. ते कुलाचाराबद्दल फार जागरुक होते. आपले मूळगाव कडवाड येथील ग्राममंदिर व श्रीशांतादुर्गा देवस्थान यांच्या जीर्णोध्दारासाठी व तेथे परंपरागत चालत आलेली देवकृत्ये पुढे निर्विघ्नपणे चालू राहण्याची व्यवस्था करण्यासाठी त्यांनी अविश्रांत श्रम घेतले होते. मधुकाकांचे २००१ साली निधन झाले तर त्यांच्या पत्नी कुसुम यांचे २००७ साली निधन झाले. उभयतांच्या स्मरणार्थ त्यांच्या कन्या श्रीमती लतिका रामचन्द्र दळवी यांनी एज्युकेशन सोसायटीला ५१ हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## श्रीमती नलिनी व श्री. महाबळेश्वर शानभाग यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्दसेवानिधीसाठी ५१ हजार रुपयांची देणगी

सचिवालयातून जॉईट सेक्रेटरी या उच्च पदावरुन निवृत्त झालेले श्री. महाबळेश्वर दामोदर शानभाग यांचे गेल्या नोव्हेम्बरमध्ये ९८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पत्नी नलिनी (विमल) यांचे दहा वर्षापूर्वी निधन झाले होते. उभयतांच्या स्मरणार्थ कॅनडास्थित पुत्र श्री. गिरीश व स्नुषा श्रीमती पद्मजा यांनी वृध्दसेवानिधीसाठी ५१ हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | सासू सासरे श्रीमती मालती व श्री. नीळकंठ भवनीशंकर धुमे व पती श्री. चंद्रशेखर नीलकंठ धुमे यांच्या स्मरणार्थ अनुक्रमे स्नुषा व पत्नी श्रीमती रेखा यांजकडून पितृपक्षानिमित्त. | १,००० |
| २. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून. | ५१,००० |
| ३. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ६ व्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| ४. | श्री.भवानीशंकर गोविंद कसबेकर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती कुंदा यांजकडून. | ५,००० |
| ५. | श्री. अरविंद काशिनाथ वर्टी यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त पत्नी श्रीमती सुहासिनी यांजकडून शुभेच्छापूर्वक भेट. | २,५०० |
| ६. | श्रीमती मालती माधव देसाई यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती लक्ष्मी नारायण शिवेश्वरकर यांजकडून. | २५,००० |
| ७. | वडील श्री. वसंत मंगेश दुभाषी व आत्या कुसुम मंगेश दुभाषी यांच्या स्मरणार्थ मुले उदिता, ऋग्वेदय व पुष्पक यांच्या कडून. | २०,००० |
| ८. | प. पू. कैवल्यपूर मठाधिपती श्री. शिवानंद सरस्वती महाराज यांजकडून संस्कृत पाठांतर स्पर्धेसाठी. | ५,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती माधुरी सुरेन्द्र वाघ यांच्या १० व्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पती श्री. सुरेन्द्र भालचंद्र वाघ व मुले अक्षय व अक्षता यांच्यातर्फे | १,००,००० |
| २. | श्री. गोविंद मारूती कसबेकर यांच्या ६ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र विनय यांजकडून. | ३,००० |
| ३. | रामचंद्र भिकू कामत यांच्या जनमशताब्दी प्रसंगी कन्या सौ. शिल्पा (नीता) व जामात श्री. सुधीर मनोहर वर्दे यांजकडून. | २,००० |

## वृध्दसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. माधव श्रीनिवास गायतोंडे यांजकडून यांच्या ७५ व्या वाढदिवसा प्रसंगी | ११,१११ |
| २. | श्री. नीलकंठ मंगेश देसाई यांच्या जन्मशताब्दी निमित्त नात डॉ. मधुरा व नातू श्री. मंदार जयप्रकाश देसाई यांजकडून. | ५,००० |
| ३. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |
| ४. | श्री. विश्वेश्वर विठ्ठल कुलकर्णी यांच्या १५ व्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती चित्रा पुत्र श्री. अमरीश व कन्या श्रीमती गौरी यांजकडून | १५,००० |

| | | |
|---|---|---|
| ५. | श्रीमती इंदू मनोहर वर्दे यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती शिल्पा व पुत्र श्री. सुधीर यांजकडून. | २,००० |
| ६. | श्रीमती नलिनी (विमल) व श्री. महाबळेश्वर दामोदर शानभाग यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. गिरीश व स्नुषा श्रीमती पद्मजा यांजकडून. | ५१,००० |
| ७. | श्रीमती रमाबाई व श्री. बी. व्ही. तेलंग, श्रीमती सुनंदा गोपीनाथ वाघ, श्री. जी. एस. वाघ, श्रीमती शकुंतला व श्री. त्रिंबक म. तेलंग, गोदावरी वाघ, श्री. आर. एस. वाघ व श्रीमती स्नेहलता वाघ यांच्या स्मरणार्थ श्री. गोपीनाथ व श्रीमती सुनंदा वाघ यांच्या मुलांकडून व श्रीमती रमाबाई व श्री. बी. व्ही. तेलंग यांच्या नातवंडाकडून. | ४,५०० |
| ८. | श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ वाघ, श्रीमती गोदावरी वाघ, श्री. रामकृष्ण वाघ व श्रीमती स्नेहलता वाघ यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुलभा रामकृष्ण वाघ यांजकडून. | २,५०० |
| ९. | श्री. माधव रामदास नायक यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी यांच्या स्मरणार्थ श्रीमती मानसी अजित नायक यांजकडून. | २,००० |
| १०. | श्रीमती माधुरी सुरेन्द्र वाघ यांच्या १० व्या पुण्यतिथी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पती श्री. सुरेन्द्र भालचंद्र वाघ व मुले अक्षय व अक्षता यांच्यातर्फे | १,००,००० |
| ११. | श्री. चंद्रशेखर नीळकंठ धुमे यांच्या प्रथम पुण्यतिथीप्रसंगी मुले विशाल व ऋचीका व नातवंडे सारा व रौनक यांच्यातर्फे | १०,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |
| २. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ६ व्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| ३. | श्रीमती कुसुम व श्री. विठ्ठल (मधु) गोविंद कसबेकर यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती लतिका रामचंद्र दळवी यांजकडून. | ५१,००० |
| ४. | श्रीमती माधुरी सुरेन्द्र वाघ यांच्या १० व्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पती श्री. सुरेन्द्र भालचंद्र वाघ व मुले अक्षय व अक्षता यांच्यातर्फे | १,००,००० |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी


| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती रेखा शरद सलगर, ठाणे | १०,००० |
| २. | श्री. अरुण भास्कर कसबेकर, चर्चगेट | १०,००० |

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

**NKGSB Bank**
**NKGSB Co-op. Bank Ltd.**

NKGSB Bank
100 YEARS of Banking Excellence

Where your convenience is always in our mind...




Contact Us: +91 22 2860 2000 | customercare@nkgsb-bank.com | www.nkgsb-bank.com
Regd. Office: Laxmi Sadan, 361, V. P. Road, Girgaum, Mumbai - 400004.

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.